




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ७३ वा | शुक्रवार, दि. ०९ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# शक्तिपीठाविरोधात 13 जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा एल्गार

## आज राज्यव्यापी लढा; दुष्काळात मदत नाही, जमिनींची मोजणी मात्र सुरू!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शक्तिपीठ महामार्गासाठी पंढरपूर तालुक्यातील आव्हे तसेच माढा तालुक्यातील बावी व सोलंकरवाडी परिसरात पोलिसांच्या बंदोबस्तात शेतकऱ्यांच्या जमिनींची जबरदस्तीने मोजणी केल्याच्या निषेधार्थ ९ ऑक्टोबर रोजी राज्यभर आंदोलने करण्याचा निर्णय शक्तिपीठविरोधी महामार्ग संघर्ष समितीच्या ऑनलाइन बैठकीत घेण्यात आला.

बैठकीत १३ जिल्ह्यांतील शेतकरी सहभागी झाले होते. ६ ऑक्टोबर रोजी ही बैठक झाली.

बैठकीत राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार सतेज पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारच्या भूमिकेवर टीका केली. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी जमिनी घेण्यासाठी बळाचा वापर केला जात असल्याचा आरोप जयंत पाटील यांनी केला.

महामार्गासाठी प्रस्तावित निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी वापरण्याची मागणी सतेज पाटील यांनी केली. पोलिसांच्या बळावर सुरू असलेल्या मोजणीला विरोध करण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला.

आव्हे येथील शेतकरी जगदीश शेंबडे यांनी बैठकीत मोजणीदरम्यान आलेल्या अनुभवाची माहिती दिली. पोलिसांनी रात्री नोटिसा देऊन गावाला वेढा घातल्याचा तसेच शेतकऱ्यांना कुटुंबासह नजरकैदेत ठेवल्याचा आरोप त्यांनी केला.

मोजणीच्या पंचनाम्यावर गावकऱ्यांनी सह्या केलेल्या नसल्याचेही त्यांनी सांगितले. समन्वयक गिरीश फोंडे यांनी



जबरदस्तीने मोजणी केल्याने जमीन संपादित झाली, असा गैरसमज सरकारने करून घेऊ नये, अशी भूमिका मांडली.

या बैठकीमध्ये कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सिंधुदुर्ग, धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी, यवतमाळ, वर्धा व सातारा यांसह १३ जिल्ह्यांतील शेतकरी सहभागी झाले. या वेळी आमदार जयंत पाटील, आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी व समितीचे समन्वयक गिरीश फोंडे यांनी मार्गदर्शन केले.

तळहाताच्या फोडाप्रमाणे जीवापाड जपलेल्या जमिनी एका क्षणात शक्तीपीठासाठी देण्यास शेतकऱ्यांचा कडाडून विरोध आहे. या जमिनी हातच्या गेल्या तर खायचे काय, अशी भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. या जाणिवेतून हा लढा पुकारण्यात येत आहे.

आमदार जयंत पाटील म्हणाले, "दुष्काळात मदत करण्याऐवजी सरकार बळजबरीने जमिनी हिसकावून घेत आहे."

"शक्तिपीठ महामार्गासाठी खर्च होणारा एक लाख कोटी रुपयांचा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी वापरावा", असे आमदार सतेज पाटील यांनी भाष्य केले.

शेट्टी यांनी विविध आंदोलनांना एकत्रित करून राज्यव्यापी लढा उभारण्याचे आवाहन केले. दरम्यान, २२ ऑक्टोबरपर्यंत सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या मोजणीच्या ठिकाणी राज्यभरातील शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, तसेच सर्वपक्षीय व्यापक लढा उभारावा, असे निर्णय घेण्यात आले. बैठकीस विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी 23 ऑक्टोबरला मतदान

## सोलापूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी 117, तर शिक्षक मतदारसंघासाठी 76 मतदान केंद्रे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक 2026 चा कार्यक्रम जाहीर झाला असून, या निवडणुकीसाठी 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान होणार आहे. मतदानाची वेळ सकाळी 8 ते सायंकाळी 4 वाजेपर्यंत राहणार असून, 27 ऑक्टोबर 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. सोलापूर जिल्हा निवडणूक प्रशासनाचे निवडणुका पारदर्शकपणे कोशन तर तुम्ही वातावरणात पार पाडण्याचे नियोजन झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी 117 मतदान केंद्रे असून, शिक्षक मतदारसंघासाठी 76 मतदान केंद्रे, अशी एकूण 193 मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. पदवीधर मतदारसंघात 49 हजार 732 मतदार, तर शिक्षक मतदारसंघात 15 हजार 306 मतदार आहेत. पदवीधर



मतदारसंघासाठी करमाळा, माढा, बार्शी, मोहोळ, सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, अक्कलकोट, सोलापूर दक्षिण, पंढरपूर, सांगोला आणि माळशिरस या विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान केंद्रे आहेत. शिक्षक मतदारसंघासाठीही याच 11 विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे, असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.

मतदान प्रक्रियेसाठी पदवीधर मतदारसंघात 117 मतदान केंद्रांकरिता आणि शिक्षक मतदारसंघात 76 मतदान केंद्रांकरिता मतदान पथकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर रॅम्प, पिण्याचे पाणी, पुरेसे फर्निचर, वीज व्यवस्था, स्वतंत्र स्वच्छतागृह, सावली आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**प्रशिक्षण :**

मतदान प्रक्रियेसाठी मतदान अधिकारी व सूक्ष्म निरीक्षकांचे प्रशिक्षण 13 ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरावर छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, रंगभवन, सोलापूर येथे होणार आहे. त्यानंतर 19 ऑक्टोबर रोजी दुसरे प्रशिक्षण, तर 22 ऑक्टोबर रोजी तिसरे प्रशिक्षण विधानसभा मतदारसंघ स्तरावर घेण्यात येणार आहे.

**मतदान अधिकारी**

निवडणूक प्रक्रियेसाठी पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले या निवडणूक निर्णय अधिकारी असून, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन हे सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर हे उपजिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

# खोटे गुन्हे, हल्ला आणि खंडणीच्या आरोपांमुळे न्यायाची मागणी

## मराठा समाज कार्यकर्ते कल्याण बाबर यांची मागणी; संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वडशिंगे येथील मराठा समाजाचे कार्यकर्ते कल्याण बाबर यांनी पोलीस प्रशासन तसेच काही स्थानिक व्यक्तींविरोधात गंभीर आरोप करत आपल्यावरील कथित खोटे गुन्हे, अडवणूक, धमकी, हल्ला आणि खंडणीच्या मागण्यांची चौकशी करून न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली असून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

बाबर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख प्रकरणात आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, यासाठी आपण ५१ लाख रुपये आणि ५ एकर जमीन बक्षीस देण्याची घोषणा केली होती, असे त्यांनी नमूद केले आहे. त्यानंतर आपल्यासह आपल्या वडिलांविरुद्ध फसवणुकीसह विविध कलमांखाली खोटे गुन्हे दाखल करून अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, न्यायालयाने या प्रकरणात त्यांना दोषमुक्त करून निर्दोष मुक्त केले, असेही निवेदनात म्हटले आहे.



**हल्ला व धमकीचेही आरोप**

न्यायालयाच्या निर्णयानंतरही आपला पाठलाग व त्रास देण्याचे प्रकार सुरूच असल्याचा आरोप बाबर यांनी केला आहे. आपल्या प्रगतीचा द्वेष करणाऱ्या काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी त्रास देण्यास सुरुवात केली. काही दिवसांपूर्वी संबंधित व्यक्तीला गावात बोलावून दमदाटी करण्यात आली तसेच आपल्या वडिलांना धक्काबुक्की केल्याने गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांच्या वडिलांवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून ते सध्या रुग्णालयात उपचार घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

**पैसे व जमिनीची मागणी केल्याचा आरोप**

आपल्या वडिलांची गंभीर अवस्था असतानाही काही जणांकडून पैशांची व जमिनीची मागणी करून खंडणी मागितली जात असल्याचा गंभीर आरोप बाबर यांनी केला आहे. निवेदनात त्यांनी नामदेव राजाराम गरड, बाळासाहेब कदम, अजित कदम, विजयकुमार कदम, रमाकांत परबत, शशिकांत गरड, शाहूराव परबत आणि विकास परबत यांच्यासह एकूण सहा जणांकडून त्रास दिला जात असल्याचा उल्लेख केला आहे.

**पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास गेल्यानंतरही धमकी**

या प्रकरणी पोलिस ठाणे तसेच पोलिस अधीक्षक कार्यालयात तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर आपल्यावरच खोटे गुन्हे दाखल करण्याची तसेच कठोर कारवाई करण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर आरोप बाबर यांनी केला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**हल्लेखोरांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी**

आपल्या वडिलांवर हल्ला करणाऱ्यांविरुद्ध तसेच खंडणी मागणाऱ्यांविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करावेत, कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे आणि निष्पक्ष चौकशी करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी बाबर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# 'लोकशाहीसाठी काळा दिवस' पाळत काँग्रेसतर्फे मोदी सरकारचा निषेध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वोटचोरी बाबत, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेची मागणी करण्यासाठी काँग्रेस अध्यक्ष आदरणीय मल्लिकार्जुन खगेर्जी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते आदरणीय राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली INDIA आघाडीचे खासदार शांततेच्या मार्गाने जंतर-मंतरकडे जात असताना विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी, खासदार प्रियंकाजी गांधी, खासदार प्रणितीताई शिंदे यांच्यासह शेकडो खासदारांना मोदी सरकारच्या आदेशावरून



पोलिसांकडून अटक करण्यात आली. या कारवाईच्या निषेधार्थ अखिल भारतीय काँग्रेसच्या आवाहनानुसार ८ ऑक्टोबर २०२६ हा दिवस 'भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस' म्हणून पाळण्यात आला.

खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीनेही शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या नेतृत्वाखाली 'काळा दिवस' पाळत मोदी सरकारच्या कारवाईचा तीव्र निषेध करण्यात आला.

यावेळी बोलताना सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे म्हणाले की, लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी आवाज उठवणारे लोकसभा विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी, खासदार प्रियंका गांधी, खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह शेकडो विरोधी पक्षांच्या खासदारांना ताब्यात घेणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या लोकप्रतिनिधींना रोखणे, त्यांच्यावर पोलिसी बळाचा वापर करणे आणि महिला खासदारांशी धक्काबुक्की करणे ही लोकशाहीसाठी निषेधार्ह बाब आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवरही चेतनभाऊ नरोटे यांनी तीव्र सवाल उपस्थित केला. मतदार याद्यांमधील अनियमितता, पात्र मतदारांची नावे वगळली जाणे, मतदारसंघनिहाय मतदारसंख्येतील बदल तसेच निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीबाबत देशभरातून प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणून जनतेच्या मनातील शंका दूर करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान मतदानाची टक्केवारी आणि मतदारसंख्येबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची पारदर्शकपणे चौकशी झाली पाहिजे. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत असले पाहिजे आणि एकाही मतदाराचा मतदानाचा अधिकार हिरावला जाऊ नये, अशी काँग्रेसची भूमिका असल्याचे नरोटे यांनी स्पष्ट केले.

नरोटे म्हणाले, 'नोटबंदीच्या काळात जनतेला रांगेत उभे राहावे लागले, गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहावे लागले आणि आता स्वतःचा मतदानाचा अधिकार टिकवण्यासाठीही जनतेला रांगेत उभे राहावे लागत आहे. हे कसले सरकार आहे?'

'Gen Z आता जागा झाला आहे. देशातील तरुणाई आणि जनता आपल्या मतदानाच्या अधिकारासाठी जागरूक झाली आहे. मतदार हा लोकशाहीचा खरा मालक आहे. त्याच्या मतावर कोणाचाही डल्ला पडू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

ते पुढे म्हणाले, राहुल गांधींसारख्या संवैधानिक पदावरील लोकप्रतिनिधींना ताब्यात घेणे, प्रियंका गांधी यांच्यासह महिला खासदारांना धक्काबुक्की करणे आणि विरोधकांच्या (पान 2 वर..)






# दुधात डिटर्जंटसह धोकादायक रसायन!

## पुण्यापासून इंदापूरपर्यंत भेसळीचे जाळे; २५ जणांना अटक

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** दुधात डिटर्जंटसह धोकादायक रासायनिक पदार्थ नॉनिलफेनॉल इथॉक्सिलेट मिसळून कृत्रिम व भेसळयुक्त दूध तयार करणाऱ्या साखळीवर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे.

पुणे जिल्ह्यातील मंचरपासून सुरू झालेल्या तपासात भेसळयुक्त



दूध थेट सोलापूर जिल्ह्यातील इंदापूर डेअरी अँड मिल्क प्रॉडक्ट्स लिमिटेड (सोनाई डेअरी), गोखळी, इंदापूर या प्रक्रिया डेअरीपर्यंत पोहोचत असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणात आतापर्यंत ३७ आरोपी निष्पन्न झाले असून २५ जणांना अटक करण्यात आली आहे.

मंचर परिसरातील गुप्त माहितीनंतर ४ जुलै रोजी अन्न व औषध प्रशासन आणि पुणे ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने अवसरी खुर्द येथील 'नवकार डिस्ट्रिब्युटर्स'वर कारवाई केली. तेथे व्हे पावडर, व्हे पर्मिएट पावडर, डिटर्जंट, इमल्सिफायर आदी संशयित पदार्थ आढळले. या कारवाईनंतर तपासाचा विस्तार पुरवठादार, साठवणूकदार, दूध संकलन व शीतकरण केंद्रे आणि प्रक्रिया डेअऱ्यांपर्यंत करण्यात आला. (पान 2 वर..)

# उजनीचे पाणी आता पिण्यासाठी राखीव; शेतीसाठी पाणी होणार बंद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उजनी धरणासह जिल्ह्यातील सर्वच जलस्रोत पुढील वर्षभर फक्त पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा मोठा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांनी याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत.

जिल्ह्यात यंदा सरासरीच्या केवळ ४५ टक्के पाऊस झाला असून, ९० टक्क्यांपेक्षा अधिक खरीप पिकांचे नुकसान झाले आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील ११ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, प्रशासन आता दुष्काळी उपाययोजनांच्या मागे लागले आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत म्हणजे जुलै २०२७ पर्यंत जिल्ह्याच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी उजनीतील सुमारे ३० ते ३५ टीएमसी पाणी राखीव ठेवण्यात येणार आहे.

याचा मोठा फटका जिल्ह्यातील ऊस पट्ट्याला बसणार आहे. त्यामुळे उसाचे क्षेत्र घटण्याची शक्यता असून, पुढील गळीत हंगामाला उसाची टंचाई भासणार आहे. सध्या उजनी धरण ९५ टक्के भरले असले तरी काटेकोर नियोजन करावे लागणार आहे.

दरवर्षी उजनीतून शेतीसाठी सुमारे ७.६४ टीएमसी पाणी सोडले जात होते, तर उद्योगासाठी ३.२५ टीएमसी पाणी द्यावे लागत होते. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे आता उजनीचे पाणी पिण्यासाठी राखीव (पान 2 वर..)




## संपादकीय

# पुन्हा भाकरीचा दुष्काळ

महाराष्ट्राच्या इतिहासात 1972 चा दुष्काळ हा 'भाकरीचा दुष्काळ' म्हणून आठवला जातो. 2026 मध्ये पुन्हा एकदा राज्यावर दुष्काळ आला आहे. दोन्ही वेळी आभाळ कोरडे राहिले, पण दोन्हीमागची परिस्थिती वेगळी आहे.

1971 आणि 1972 अशा सलग दोन वर्षी पाऊस दगा देऊन गेला होता. पुणे, सोलापूर, अहमदनगर, बीड, उस्मानाबाद, सांगली, सातारा या पट्ट्यात अनेक ठिकाणी सरासरीच्या निम्म्याहून कमी पाऊस झाला. विहिरी, तलाव कोरडे पडले, ज्वारी-बाजरी उगवलीच नाही आणि जनावरे चार्‍याविना मरू लागली.

जवळजवळ संपूर्ण राज्य दुष्काळाच्या छायेत होते. त्या वेळी महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे 5.04 कोटी होती आणि भारताची सुमारे 55 कोटी. बहुसंख्य लोक खेड्यात राहत होते आणि त्यांची उपजीविका पूर्णपणे पावसावर अवलंबून होती.

1972 म्हटले की मिलो आठवतो. त्या वर्षी देशात अन्नधान्याचे उत्पादन सुमारे 8 टक्क्यांनी घटले आणि भारताला अमेरिकेच्या पीएल-480 योजनेखाली परदेशी धान्यावर अवलंबून राहावे लागले. त्यातून आलेली लाल ज्वारी म्हणजे मिलो रेशन दुकानांतून वाटली गेली. अमेरिकेत ती प्रामुख्याने जनावरांचे खाद्य म्हणून वापरली जात असे, त्यामुळे चव, रंग आणि भाकरीच्या दृष्टीने ती लोकांना रुचली नाही, तरीही उपासमार टळावी म्हणून लोकांनी ती खाल्ली. मिलो हे केवळ धान्य नव्हते, तर परावलंबित्वाची आणि अन्नसुरक्षेच्या अपयशाची खूण होते.

अन्नटंचाईबरोबर आलेली महागाई हा दुसरा मोठा घाव होता. 1972-73 मध्ये घाऊक किंमत निदेर्शांकातील वाढ सुमारे 10 टक्के होती, पण 1973-74 मध्ये ती 20 टक्क्यांच्या पुढे गेली. दुष्काळ, 1973 चे तेलाचे संकट आणि पुरवठ्यातील अडथळे यांमुळे 1974 च्या अखेरीस महागाई 25 टक्क्यांच्या आसपास पोहोचली आणि त्याचा सर्वाधिक फटका गरिबांना बसला.

बांगलादेश युद्धाचा खर्च, सुमारे एक कोटी निर्वासितांचा भार, परकीय चलनाची चणचण, अमेरिकेची आखडलेली मदत आणि जवळपास शून्य विकासदर यांमुळे देशाची आर्थिक स्थिती नाजूक होती. शेती अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने पाऊस अपयशी ठरताच संपूर्ण अर्थव्यवस्था हलली. वस्त्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा केला जायचा.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते यवतमाळ जिल्ह्याचे वसंतराव नाईक. जिल्ह्यातील पाण्याचे दुर्भिक्ष पाहून त्यांनी लगेच निळोणा धरण योजना सुरू केली. या मध्यम आकाराच्या मातीच्या धरणाचे काम 1974 मध्ये पूर्ण झाले आणि यवतमाळ शहराचा पाण्याचा प्रश्न बर्‍याच प्रमाणात कमी झाला. धरणामुळे इतर पाण्याचे स्त्रोतही भरले.

सरकारी प्रतिसादातून एक ऐतिहासिक दिशा मिळाली. मोफत अन्न देण्याऐवजी दुष्काळी कामांवर श्रमाचा मोबदला देण्याचा मार्ग स्वीकारला गेला. लाखो लोकांना काम मिळाले आणि रस्ते, तलाव, बंधारे उभे राहिले. हाच रोजगार हमी योजनेचा पाया ठरला, ज्याला 1977 मध्ये कायद्याचे रूप मिळाले आणि पुढे तोच पाया राष्ट्रीय पातळीवर 'मनरेगा'च्या रूपाने आला.

आता 2026 कडे येऊ. यंदा पाऊस पूर्णपणे गायब झाला नाही, पण ऐन गरजेच्या वेळी दडी मारून बसला. 1 जून ते 18 सप्टेंबर या काळात राज्यात 755.9 मिमी पाऊस झाला, तर सरासरी 932.3 मिमी आहे, म्हणजे एकूण तूट 18.8 टक्के आहे. ही तूट सर्वत्र सारखी नाही. छत्रपती संभाजीनगर विभागात 30.8 टक्के तूट आहे, तर कोकणात 6.3 टक्के आणि सोलापूरमध्ये सरासरीच्या फक्त 48.65 टक्के पाऊस पडला.

जुलैत सरासरीपेक्षा 40 टक्के जास्त पाऊस झाला, पण ऑगस्टमध्ये तो सामान्याहून 46 टक्के कमी पडला. 25 सप्टेंबरच्या शासन निर्णयाने ट्रिगर-1 निकषानुसार 358 पैकी 265 तालुक्यांत, म्हणजे सुमारे तीन चतुर्थांश क्षेत्रात, दुष्काळ जाहीर झाला.

पेरणी झाली, पण पिके वाचली नाहीत. खरीप पेरणी 137.27 लाख हेक्टरवर झाली, जी पाच वर्षांच्या सरासरीच्या सुमारे 95 टक्के आहे, मात्र पावसाच्या खंडाने उत्पादनावर घाला घातला. सोलापूरमध्ये उत्पादनहानी 90 टक्क्यांपर्यंत, तर बुलढाणा-जालन्यात सोयाबीन-कापसाची घट 60 ते 75 टक्के असू शकते. सोयाबीन, कापूस, मूग आणि उडीद ही पिके अडचणीत आली, तर काही भागांत 40 दिवसांहून अधिक काळ पावसाचा खंड राहिला. धाराशिव, बीडमध्ये जुलैपासून पाऊसच पडलेला नाही.

16 सप्टेंबरला अनेक जिल्ह्यांत शेतकर्‍यांनी दुष्काळी मदतीसाठी आंदोलने केली. राष्ट्रीय पातळीवरही एल निनोमुळे भारत 17 वर्षांतील सर्वात कमकुवत मान्सूनकडे जात आहे. खरं तर ही वेळ यायलाच नको होती. कारण जेवढं लक्ष मुंबई-पुणे भागातील रस्ते, पूल, मेट्रो यांच्याकडे दिले जात आहे, त्यातला थोडा वाटा जर गोसीखुर्दपासून महाराष्ट्रातल्या सर्व पाटबंधारे प्रकल्पांना दिला असता तर दुष्काळाचे चटके कमी झाले असते. पण रस्ते, मेट्रो, पूल, मिसिंग लिंक यांतील तथाकथित आर्थिक हितसंबंध आणि पाटबंधारे प्रकल्पांतील व्यवहार यात बराच फरक आहे.

1972 सारखी अन्नटंचाई नाही. हरित क्रांतीनंतर देशाकडे धान्याचे मोठे साठे आहेत, भारत धान्य निर्यात करणारा देश आहे आणि रेशनवर धान्य मिळण्याची हमी आहे. त्यामुळे मिलोसारख्या आयातीचा प्रश्नच उरलेला नाही. आजचा प्रश्न पोट भरण्याचा नसून शेतकर्‍याची कमाई बुडण्याचा, कर्जाचा आणि पाण्याचा आहे. धान्यसाठ्यांमुळे 1974 सारखी बेफाम महागाई संभवत नाही, असे सर्वसाधारण मत आहे.

महाराष्ट्राची लोकसंख्या आज अंदाजे 13 कोटी आणि देशाची 145 कोटींहून अधिक आहे, म्हणजे राज्यात 1972च्या तुलनेत अडीच पटीहून अधिक माणसे आहेत. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि शहरांचा पुरवठा यांवरचा ताण त्यामुळे कैकपटीने वाढला आहे. जवळपास निम्मे लोक आता शहरात राहतात, त्यामुळे दुष्काळाचा फटका पाणीपुरवठा आणि दरवाढीतून शहरांनाही बसतो.

मुंबईत देशाच्या कानाकोपर्‍यातून रोज सुमारे एक हजार माणसे येतात. त्यातच एल निनोमुळे डाळी, तेलबिया, कापूस आणि भाजीपाल्याच्या किमतींवर परिणाम होण्याची चिंता आहे. आर्थिकदृष्ट्या महाराष्ट्र आज देशातील सर्वात मोठ्या राज्य-अर्थव्यवस्थांपैकी एक असून उद्योग, सेवा आणि वित्तक्षेत्रावर आधारित आहे. राज्याच्या उत्पन्नात शेतीचा वाटा खूपच कमी झाला आहे, तरीही मोठा कामगारवर्ग अजूनही शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे राज्याचे एकूण उत्पन्न टिकले, तरी ग्रामीण उत्पन्न आणि मागणी घसरते, हा आजचा मोठा विरोधाभास आहे.

1972 मध्ये जनतेला काम आणि अन्न दिले गेले, तर आज कर्ज, वीज आणि रोख मदत हे मुख्य साधन आहे. ही मदत वेळेत पोहोचली, तरच शेतकरी पुन्हा उभा राहील. खरा धडा असा की मिलोच्या काळातून आपण अन्नसुरक्षा कमावली, पण पाणीसुरक्षा अजून कमावायची आहे.

निळोणा धरणाने यवतमाळला जो दिलासा दिला, तोच दिलासा राज्यभरातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण होऊन मिळू शकतो. जलसंधारण, पीकरचना, विमा आणि वेळेवर मदत यावर लक्ष दिले नाही, तर धान्याने गोदामे भरलेली असूनही गावे कोरडी राहतील. मुंबई पुणे यांच्या विकासाप्रमाणेच धरणांच्या पूर्णतेकडे लक्ष दिलं जाईल ही अपेक्षा.

# सिनेसृष्टीतील तारा आणि सामाजिक परखड व्यक्तीमत्त्व काळाच्यापल्याड नाहिसा




नटसम्राट नाना पाटेकर यांच्या अकाली निधनाने एक उत्तम अभिनेता आणि सामाजिक भान असलेला लोकप्रिय कलाकार गमावल्याची भावना सर्वत्र व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. मराठी सिनेसृष्टीसह बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवलेल्या नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वासह महाराष्ट्रावरही शोककळा पसरली आहे. नानांच्या रुपाने प्रतिभावंत कलाकारासह सामाजिक भान असलेले उमदे व्यक्तिमत्व हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कलाकार सामाजिक, राजकीय भूमिका घेत नसल्याचा आक्षेप वारंवार घेतला जातो. मात्र नाना पाटेकर हे नेहमीच याला अपवाद राहिले. नाना पाटेकर यांना गोव्यातील दोना पावला येथील घरी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर त्यांना उपचारासाठी तातडीने मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी त्यांना ४५ मिनिटे 'कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन (सीपीआर) अर्थात हृदय व फुफ्फुसांचे पुनरुज्जीवन' देऊन त्यांचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र उपचारांदरम्यान पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

नाना पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथे एका मराठी कुटुंबात झाला. त्यांचे खरे नाव विश्वनाथ पाटेकर आहे. हे नाव फार थोड्या लोकांना माहीत आहे. त्यांचे वडील गजानन पाटेकर व्यापारी होते, तर आई निर्मला पाटेकर गृहिणी होत्या. नाना पाटेकर यांना अशोक आणि दिलीप पाटेकर असे दोन भाऊ आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव नीलकंती पाटेकर असून त्या बँक अधिकारी होत्या. नाना पाटेकर यांना दोन मुले, मात्र त्यापैकी एका मुलाचे दुर्दैवाने निधन झाले, तर मल्हार नावाचा मुलगा आहे. चित्रपटसृष्टीमध्ये ते नाना पाटेकर या नावाने परिचित झाले होते. व्यक्तिमत्त्वातील जरब, जबरदस्त संवादफेक या बळावर त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.

नाना पाटेकर यांनी मुंबईत राहून शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांची शाळा समर्थ विद्यालय होती. त्यानंतर त्यांनी वांद्रे स्कूल ऑफ आर्टमध्ये (आताचे एल.एस. रहेजा स्कूल ऑफ आर्ट) शिक्षण घेतले आणि सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून पदवी घेतली आहे. चित्रपट क्षेत्रात नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये 'गमन' या सिनेमातून पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या अभिनयाला तीन राष्ट्रीय पुरस्कार, दोन फिल्मफेअर पुरस्कार मिळाले असून २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. याशिवाय अनेक प्रतिष्ठित पुरस्कार आणि सन्मान त्यांच्या नावावर आहेत. प्रहार चित्रपटाच्या तयारीसाठी तीन वर्षांच्या प्रशिक्षण कालावधीनंतर नाना यांना १९९० मध्ये भारतीय प्रादेशिक सैन्यात मानद कॅप्टन म्हणून नियुक्त करण्यात आले आणि त्यांनी जनरल व्ही.के. सिंग यांच्यासोबत काम केले, ज्यांच्याकडे त्यावेळी कर्नलची रँक होती आणि त्यांचा एक कॅमिओ होता. १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान, नाना पाटेकर यांनी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटमध्ये मानद मेजर म्हणूनही सेवा दिली आहे.

नाना पाटेकर यांनी अभिनयासोबत सामाजिक क्षेत्रामध्येही आपल्या कार्याची छाप पाडली होती. त्यांनी नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून शेतकर्‍यांसाठी सामाजिक कार्य सुरु केले होते. समाजातील वंचित घटकांसाठी, प्रामुख्याने दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मोठे सामाजिक कार्य केले आहे. सप्टेंबर २०१५ मध्ये अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासह त्यांनी नाम फाउंडेशन या संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा (लातूर, उस्मानाबाद) परिसरातील दुष्काळ आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आर्थिक मदत केली. दुष्काळमुक्तीसाठी गावांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि जलसंधारणाची विविध कामे व बंधारे बांधण्याचे मोठे प्रकल्प 'नाम' फाउंडेशनच्या माध्यमातून राबवले. शेतकरी कुटुंबातील गरीब मुलींच्या विवाहासाठी आर्थिक हातभार लावणे तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणे ही कामे केली. बिहारमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 'अनुभूती' या संस्थेद्वारे निधी दिला. तसेच 'पाठशाला या चित्रपटाचे मानधन आणि राज कपूर पुरस्काराची १० लाख रुपयांची संपूर्ण रक्कम त्यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी दान केली. ते आपल्या मिळकतीचा मोठा वाटा सामाजिक कायार्साठी व मदतीसाठी वापरत असत.

अशा या ज्येष्ठ अभिनेत्याच्या निधनाचे दुःखद वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असामान्य, संवेदनशील आणि प्रभावी पर्व आज संपले आहे. आपल्या दमदार अभिनयाने, आगळ्या संवादफेकीने आणि प्रत्येक भूमिकेतील विलक्षण सहजतेने त्यांनी रसिकांच्या मनावर कायमची अमिट छाप उमटवली. परिंदा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, वेलकम, पक पक पकाक, देऊळ, नटसम्राट अशा अनेक चित्रपटांमधून त्यांच्या अभिनयाचे विविध पैलू रसिकांना अनुभवायला मिळाले. कलाकार म्हणून यशस्वी असतानाच सामाजिक प्रश्नांप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून केलेली कृतिशील समाजसेवा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तितकाच प्रेरणादायी पैलू होता. त्यांच्या निधनाने भारतीय कलाविश्वाने एक संवेदनशील आणि प्रतिभावान कलाकार, तर समाजाने एक कृतिशील व सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांच्या अभिनयाची, विचारांची आणि सामाजिक कायार्ची अमिट छाप सदैव स्मरणात राहील.

**- सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१

पान १ वरून

## 'लोकशाहीसाठी काळा दिवस' पाळत...

आवाज दडपण्यासाठी पोलिसी बळाचा वापर करणे ही लोकशाहीसाठी अत्यंत चिंताजनक बाब आहे. काँग्रेस आणि INDIA आघाडी संविधान व लोकशाहीच्या रक्षणासाठी शेवटपर्यंत लढणार आहे.

ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेबाबत पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित होईपर्यंत काँग्रेसचा संघर्ष थांबणार नाही, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. लोकशाही संपवण्याचे कोणतेही षडयंत्र यशस्वी होऊ देणार नाही. संविधान, मतदानाचा अधिकार आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी काँग्रेसचा लढा सुरूच राहील. जनतेचा आवाज दाबता येणार नाही. मताचा अधिकार वाचवण्यासाठी काँग्रेस रस्त्यावर उतरली आहे आणि लोकशाही वाचवण्यासाठी हा संघर्ष शेवटपर्यंत सुरूच राहील, असा निर्धार चेतनभाऊ नरोटे यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी महापौर अरिफ शेख, नगरसेवक प्रा. नरसिंह आसादे, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपडंला, प्रवक्ता सेल अध्यक्ष नागनाथ कदम, रोजगार व बेरोजगार विभाग अध्यक्ष रुपेश गायकवाड, यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक खन्ना, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, विचार सेल अध्यक्ष ॲड. करीमुन्निसा बागवान, व्यापार व वाणिज्य सेल अध्यक्ष पशुपती माशाळ, ब्लॉक अध्यक्ष शिवशंकर आंजनाळकर, परशुराम सतारेवाले, एन. के. मुल्ला, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, हाजी मैनुद्दीन शेख, राजन कामत, प्रा. सिद्राम सलवदे, रमेश फुले, बाबू विटे, नागेश म्याकल, संजय गायकवाड, भीमराव शिंदे, मोहसीन फुलारी, माजी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, शोभा बोबे, मुमताज तांबोळी, ज्योती गायकवाड, रेखा बिनेकर, छाया हिरवटे, नूरअहमद नलवार, ऐजाज बागवान, धीरज खंधारे, राम चिगरल्लू, दिनेश डोंगरे, सचिन पवार, महेंद्र शिंदे, अस्लम शेख, दशरथ सामल, शिवाजी साळुंखे, आनंद मोरे, सुनील डोळसे, प्रकाश कवडे, केतन कांबळे, आप्पा सलगर, शुकुर शेख, अभिलाष अच्युगटला आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुधात डिटर्जंटसह धोकादायक...

मंचर येथील आकाश डेअरी फार्ममधून घेण्यात आलेल्या सहाही दूध नमुन्यांमध्ये प्रयोगशाळेच्या अहवालानुसार डिटर्जंट आढळले. पूरक अहवालात या सर्व नमुन्यांमध्ये अल्फॉक्स-२०० इथॉक्सिलेट अर्थात नॉनिलफेनॉल इथॉक्सिलेट आढळल्याचे नमूद आहे.

तसेच या नमुन्यांमधील फॅट आणि एसएनएफचे प्रमाणही निर्धारित मानकांपेक्षा कमी असल्याचे समोर आले. मंचर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात आतापर्यंत ३७ आरोपी निष्पन्न झाले आहेत. २५ आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून १२ आरोपींना अटकपूर्व जामीनमिळाला आहे.

मंचर तपासातून पुढे आलेल्या माहितीनुसार, पिलीव येथील महालक्ष्मी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स योगिनीनाथा मिल्क सप्लायर्स टँकर क्रमांक एमएच-४३-बीपी-९५९७ सोनाई डेअरी, गोखळी, इंदापूर अशी पुरवठा साखळी प्रथमदर्शनी समोर आली आहे. या साखळीला पुष्टी देणारी दूध वितरण चलने आणि टँकर पोहोच चलने तपास यंत्रणेला मिळाली आहेत.

**कॅडिलाच्या तीन गोदामांचे परवाने रद्द**

एकाच ब्रँडच्या नावाखाली वेगवेगळे औषध घटक असलेली औषधे बाजारात उपलब्ध करून दिल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कॅडिला फार्मास्युटिकल्स लिमिटेडच्या राज्यातील तीन सीएफए गोदामांवर कारवाई केली आहे. पुणे, नागपूर आणि ठाणे येथील कंपनीच्या सीएफए गोदामांचे औषध विक्री व वितरण परवाने रद्द करण्यात आले आहेत.

**माळशिरसमध्ये १६,७३० लिटर दूध नष्ट**

पिलीव येथील महालक्ष्मी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्सच्या दुधाच्या नमुन्यात फॅट २.७ टक्के, एसएनएफ ७.०४ टक्के आणि डिटर्जंट पॉझिटिव्ह आढळले. त्यामुळे ७,६३४ लिटर दूध, किंमत ३ लाख ५ हजार ३६० रुपये, जागेवर नष्ट करण्यात आले.

तर डेलीविश ॲग्रो डेअरी प्रॉडक्ट प्रा. लि.च्या दुधाच्या नमुन्यात फॅट २.५ टक्के, एसएनएफ ७.२८ टक्के आणि डिटर्जंट आढळले. या कारवाईत ९,०९६ लिटर दूध, किंमत ३ लाख ६३ हजार ८४० रुपये, नष्ट करण्यात आले.

दोन्ही कारवायांत मिळून १६ हजार ७३० लिटर दूध आणि सुमारे ६ लाख ६९ हजार २०० रुपयांचा साठा नष्ट करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणांत माळशिरस पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# निवडणूक प्रचारातील जाहिरातींवर नियंत्रणासह पेड न्यूजच्या प्रकरणांवर समिती ठेवणार लक्ष

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार विधान परिषद पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६ च्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (Media Certification and Monitoring Committee-MCMC) गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी प्राप्त अधिकारानुसार या समितीची स्थापना केली आहे.

या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी एस. कार्तिकेयन असून अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी (उत्तर सोलापूर २४९ विधानसभा मतदारसंघ), कार्यक्रम अधिकारी सोमेश्वर पाटील, आकाशवाणी सोलापूर, पोलीस निरीक्षक भालचंद्र ढवळे, सायबर पोलीस ठाणे, सोलापूर तसेच डॉ. श्रीराम दगडू राऊत, प्राध्यापक, संगणकशास्त्र विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे सदस्य आहेत. जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के हे समितीचे सदस्य सचिव आहेत.

समितीकडे इलेक्ट्रॉनिक व छापील माध्यमांमधील निवडणूक जाहिरातींच्या परवानगीसाठी प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार असून, सदस्य सचिवांकडे प्राप्त प्रस्तावांची समितीमार्फत छाननी केली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित अर्जदारास मंजुरीचे प्रमाणपत्र अथवा नामंजुरीचे पत्र देण्यात येणार आहे.

निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत सोशल मीडिया, केबल नेटवर्क, आकाशवाणी, एफएम रेडिओ, दूरदर्शन वाहिन्या तसेच वर्तमानपत्रांमधून प्रसारित होणाऱ्या निवडणूक प्रचाराच्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवणे, जाहिरातींना नियमानुसार परवानगी देणे तसेच पेड न्यूजच्या प्रकरणांमध्ये आवश्यक कार्यवाही करणे, ही समितीची प्रमुख कामे राहणार आहेत. भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार समितीचे कामकाज करण्यात येणार आहे.

**जाहिरात प्रामाणिकरण करण्यासाठी संपर्क करावा**

जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे कार्यालय जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय इमारतीमधील तळमजला येथील जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर येथे आहे. तरी राजकीय पक्ष तसेच उमेदवार किंवा उमेदवार प्रतिनिधी यांनी राजकीय जाहिराती प्रमाणित करून घेण्यासाठी समिती कार्यालयात संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# सोलापूर शहरात उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार महोदय यांच्या सूचनेनुसार तसेच महापौर विनायक कोंड्याल, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे व सहा. आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सणासुदीच्या पार्श्वभूमीवर दि. ०२ ऑक्टोबर २०२६ पासून पुढील १५ दिवस संपूर्ण सोलापूर शहरात विशेष सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

सणासुदीच्या काळात शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने या विशेष मोहिमेअंतर्गत सोलापूर शहरातील सर्व भागांमध्ये व्यापक स्वरूपात स्वच्छता उपाययोजना करण्यात येत आहेत. यामध्ये शहरातील विविध भागांमध्ये घंटागाड्यांमार्फत कचरा संकलन, तसेच जेसीबी व डंपरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असलेल्या ठिकाणांची स्वच्छता करण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या सेवकांमार्फत फुटपाथवरील वाढलेले गवत, अनावश्यक झाडेझुडपे व इतर अडथळे हटविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. शहरातील ज्या ठिकाणी वारंवार मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो, अशा ठिकाणी कचरा पुन्हा टाकला जाऊ नये यासाठी महानगरपालिकेचे सेवक नियुक्त करून विशेष देखरेख ठेवण्यात येत आहे.

शहर स्वच्छतेस बाधा आणणाऱ्या तसेच वारंवार उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता महानगरपालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेचा वापर करावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**त्यानुसार उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईचा झोननिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे -**

| | | |
|---|---|---|
| झोन क्र. १ दंडात्मक कारवाईची संख्या | ७ दंड वसुलीची रक्कम | रु. १,०५०/- |
| झोन क्र. २ दंडात्मक कारवाईची संख्या | ४ दंड वसुलीची रक्कम | रु. ६००/- |
| झोन क्र. ३ दंडात्मक कारवाईची संख्या | ४ दंड वसुलीची रक्कम | रु. ६००/- |
| झोन क्र. ४ दंडात्मक कारवाईची संख्या | ३ दंड वसुलीची रक्कम | रु. ४५०/- |
| झोन क्र. ५ दंडात्मक कारवाईची संख्या | १० दंड वसुलीची रक्कम | रु. १,५००/- |
| झोन क्र. ६ दंडात्मक कारवाईची संख्या | ९ दंड वसुलीची रक्कम | रु. १,३५०/- |
| झोन क्र. ७ दंडात्मक कारवाईची संख्या | ४ दंड वसुलीची रक्कम | रु. ६००/- |
| झोन क्र. ८ दंडात्मक कारवाईची संख्या | ९ दंड वसुलीची रक्कम | रु. १,३५०/- |
| एकूण दंडात्मक कारवाईची संख्या | ५० एकूण दंड वसुलीची रक्कम | रु. ७,५००/- |

**नागरिकांना आवाहन**

सोलापूर शहर स्वच्छ, सुंदर व निरोगी ठेवण्यासाठी नागरिकांनी महानगरपालिकेच्या स्वच्छता यंत्रणेस सहकार्य करावे. उघड्यावर, रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर अथवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये. घंटागाडी येत नसल्यास आपल्या झोन कार्यालयास संपर्क साधावा अथवा mysolapur या मोबाईल ऐपवर तक्रार नोंद करावे. तसेच कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीमध्येच द्यावा तसेच ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे देऊन शहर स्वच्छता व्यवस्थेस सहकार्य करावे.

स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वच्छतेच्या नियमांचे पालन करून 'स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर' या संकल्पनेसाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## उजनीचे पाणी आता पिण्यासाठी राखीव...

ठेवण्यात येणार आहे. रब्बी सोलापूरः जिल्ह्यातील उसाचे आवर्तन बंद होण्याची भीती आहे.

विशेषतः उजनी बॅकवॉटरवर अवलंबून असलेल्या पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यांतील ७५ गावांची हजारो एकर ऊस शेती थेट अडचणीत येणार आहे. उर्वरित जिल्ह्यातील सात मध्यम प्रकल्पांपैकी सहा प्रकल्पामध्ये ३० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा असून, तीन प्रकल्पांमध्ये १० टक्क्यांपेक्षाही कमी पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ऊस शेती आता चांगलीच अडचणीत येणार असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

ऑक्टोबरनंतर शेतीसाठी पाणी आवर्तन बंद? येत्या १५ ऑक्टोबरपर्यंत खरिपासाठीचे शेवटचे रोटेशन सुरू राहणार असून, त्यानंतर पाणी फक्त पिण्यासाठीच वापरले जाणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जाहीर केले आहे. एल निनोच्या प्रभावामुळे पुढील काळात १० ते १२ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन व इतर गोष्टीमुळे तूट होणार असल्याचे गृहीत धरून प्रशासनाने हा कठोर निर्णय घेतला आहे. उजनी आणि इतर धरणातील पाण्याचे नियोजन करताना प्रथम पिण्यासाठी नंतर उद्योगासाठी त्यानंतर जनावराच्या पिण्यासाठी चाऱ्यासाठी यानंतर जर पाणी शिल्लक राहिलं तर त्याचा शेतीच्या सिंचनासाठी विचार केला जाणार आहे. त्यामुळे सवार्नीच पाणी जपून वापरावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

सध्या जिल्ह्यावर दुष्काळाचे गडद सावट आहे. त्यामुळे उजनीतील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. त्याबाबत शासन निर्णयही जारी झाला आहे. मात्र, शेतीच्या पाण्याचे आवर्तन सोडण्याचा संपूर्ण अधिकार कालवा सल्लागार समितीला आहे.

**- सु. स. खांडेकर,**
अधी. अभियंता जलसंपदा

## वात्रटिका

### आता दिल्लीत बस्तान

कोण अयोध्येत आहे
तर कोण आहे लंकेत...
गल्लीतील दिल्लीत जातील
असे दिसतात नवे संकेत...

नको, नाही म्हणणाऱ्याचीच
बहुतेक दिल्ली वारी आहे...
कानावर आलेली ही बातमी
बहुदा खरी आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# हुंडा छळाच्या खटल्यात पती, सासू व दिराची निर्दोष मुक्तता



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हुंडा मागणी करून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याच्या आरोपावरून दाखल करण्यात आलेल्या फौजदारी खटल्यात पती, सासू व दिराची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र. ३) विनायक एम. रेडकर यांच्या न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये हा आदेश दिला.

जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दाखल गु.र.नं. २४२/२०१८ नुसार सौ. मेघाली यांनी पती सागर, सासू सुमन, दीर संतोष व सासरे सूर्यकांत यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. व्यापारासाठी दोन लाख रुपयांच्या हुंड्याची मागणी करून शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला होता. पोलिसांनी तपास पूर्ण करून भा.दं.वि. कलम ४९८-अ सह ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले होते.

सुनावणीदरम्यान आरोपी सासरे सूर्यकांत यांचे निधन झाल्याने त्यांच्याविरुद्धचा खटला निष्प्रभ झाला. उर्वरित आरोपींविरुद्ध सुनावणी सुरू राहिली.

अंतिम युक्तिवादात बचाव पक्षाने अभियोग पक्षाच्या पुराव्यांचे विश्लेषण करून आरोप वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध झाले नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या मदनमोहन अबोट विरुद्ध पंजाब राज्य या न्यायनिर्णयाचा दाखलाही देण्यात आला.

तसेच कौटुंबिक न्यायालयातील हिंदू विवाह याचिका क्र. अ-४७७/२०२१ मधील निर्णयाचा आधार घेत पतीस घटस्फोट मंजूर झाल्याचा पुरावा न्यायालयासमोर सादर करण्यात आला. कलम ४९८-अ अंतर्गत आवश्यक असलेली क्रूरता व छळ अभियोग पक्षाला वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध करता आला नसल्याचा बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने तिघांची निर्दोष मुक्तता केली.

आरोपी सागर, सुमन व संतोष यांची भा.दं.वि. कलम ४९८-अ सह ३४ मधून फौ.प्र.सं. कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली. त्यांचे जामीनरोखे व जातमुचलके रद्द करण्यात आले. तसेच अपीलाच्या औपचारिकतेसाठी फौ.प्र.सं. कलम ४३७-अ अंतर्गत प्रत्येकी २५ हजार रुपयांचे जातमुचलके दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले.

या प्रकरणात आरोपींतर्फे ॲड. श्रीनिवास कटकूर व ॲड. आकाश आयंची यांनी यशस्वीपणे काम पाहिले.

# 'नो डीजे, नो डॉल्बी'ला प्राधान्य
## पारंपरिक मिरवणुकीतून गणेशोत्सव साजरा करणाऱ्या 'आझादचा राजा'चा गौरव



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील तब्बल ९२ वर्षांची परंपरा असलेल्या व पहिला मानाचा गणपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'आझादचा राजा' गणेशोत्सव तरुण मंडळाचा सोलापूर जिल्हा पोलिस प्रशासनाच्या वतीने गौरव करण्यात आला. सन २०२६ चा गणेशोत्सव नो डीजे, नो डॉल्बी, शांततापूर्ण, पारंपरिक व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केल्याबद्दल मंडळाला प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह (ट्रॉफी) प्रदान करण्यात आले.महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या मार्गदर्शनाखाली पोलिस प्रशासनाने यंदाचा गणेशोत्सव शांततेत, शिस्तबद्ध तसेच पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन गणेश मंडळांना केले होते. सोलापूर जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केलेल्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत 'आझादचा राजा' मंडळाने अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे व डॉल्बीला फाटा देत पारंपरिक वाद्यांचा वापर केला. मंडळाच्या वतीने मिरवणुकीत मानाची ज्योतिबा व मानाची काठी यांचा धार्मिक व पारंपरिक देखावा सादर करण्यात आला. या देखाव्याने तसेच शिस्तबद्ध आणि शांततापूर्ण मिरवणुकीने उपस्थित भाविकांची मने जिंकली. गणेशोत्सवात धार्मिक परंपरा, सामाजिक सलोखा आणि पोलिस प्रशासनाच्या सूचनांचे पालन केल्याबद्दल मंडळाच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. सोलापूर जिल्हा पोलिस कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रेरणा कट्टे, अपर पोलिस अधीक्षक सोलापूर ग्रामीण विजय कबाडे तसेच नातेपुते पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर यांच्या हस्ते 'आझादचा राजा' गणेशोत्सव तरुण मंडळाला प्रशस्तीपत्र व ट्रॉफी प्रदान करण्णयात आली.यावेळी मंडळाच्या वतीने मार्गदर्शक शक्तीभैय्या पलंगे, सागर इंगोले, संजय पलंगे, उपाध्यक्ष अक्षय पलंगे, तसेच कार्तिक पलंगे, रविंद्र कोतमिरे आदी उपस्थित होते.

'आझादचा राजा' गणेशोत्सव तरुण मंडळाकडून दरवर्षी धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचे विविध उपक्रम राबविले जातात. यंदा पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करून पोलिस प्रशासनाला दिलेल्या सहकार्याबद्दल मंडळाचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी व मैदानी स्पर्धेत लिटिल स्टार इंग्लिश मीडियम स्कूलचे उल्लेखनीय यश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत लिटिल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल, कुमठेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

सफा एजाज शेख हिने १७ वर्षे वयोगटात सुवर्णपदक पटकावत प्रथम क्रमांक मिळवला, तर शगुन शिवप्पा राठोड हिने १९ वर्षे वयोगटात कांस्यपदक (ब्राँझ मेडल) मिळवले. या दोन्ही विद्यार्थिनींची अहिल्यानगर येथे होणाऱ्या विभागस्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच सफा एजाज शेख हिने तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत गोळाफेक या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला असून, तिची पंढरपूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. एका विद्यार्थिनीने तलवारबाजी आणि मैदानी स्पर्धा अशा दोन्ही क्रीडा प्रकारांत मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरत आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव माने, सोलापूर महानगरपालिके चे नगरसेवक तथा संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने, संस्थेच्या विश्वस्त स्वातीताई माने, शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी पवार, शाळेचे समन्वयक मलकरी कोरे, माध्यमिक प्रशाला कुमठे व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक अंबादास रेडे, तसेच ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख संजय जाधव यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थिनींना शाळेचे क्रीडाशिक्षक एनआयएस प्रशिक्षक विक्रम पवार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या यशामुळे लिटिल स्टार इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा जोडला गेला आहे.

# पुणे विभाग शिक्षक मतदार संघाकरिता निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक म्हणून डॉ. हनमनलू तुम्मोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शीतल तेली- उगले यांनी दिली आहे.

श्री. तुम्मोड यांचा निवासाचा पत्ता 'शिवनेरी', व्हीव्हीआयपी सर्कीट हाऊस, बंडगार्डन पुणे असा असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ८२०८३८७७६९ असा आहे. निवडणूक निरीक्षक यांना व्हीव्हीआयपी सर्कीट हाऊस येथे सकाळी १० ते ११ या वेळेत भेटता येईल. तसेच नमूद भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी अनिल बडे हे असून त्यांचा संपर्क क्र. ९२८४०५८४११ असा आहे, असेही निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरुद्ध १२८ गुन्हे; ११९ आरोपी अटक



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** गांधी सप्ताहाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरुद्ध विशेष मोहीम राबवून धडक कारवाई केली. दि. २ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात एकूण १२८ गुन्हे उघडकीस आणण्यात आले. यापैकी १२२ गुन्ह्यांमध्ये आरोपी निष्पन्न झाले असून ६ गुन्हे बेवारस स्वरूपाचे आहेत. या कारवाईत ११९ आरोपींना अटक करण्यात आली असून २१ वाहने जप्त करण्यात आली आहेत. जप्त वाहनांसह एकूण ६५ लाख ९४ हजार ८९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये सुमारे २६.३६ लाख रुपये किमतीच्या वाहनांचा समावेश आहे.

विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, उपअधीक्षक सौरभ बा. अदाटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आवश्यकतेनुसार पोलीस विभागाच्या समन्वयाने ही कारवाई करण्यात आली.

या विशेष मोहिमेत अवैध हातभट्टी दारू निर्मिती केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. अवैध मद्यनिर्मितीसाठी वापरण्यात येणारा मोठ्या प्रमाणातील रसायनसाठा, हातभट्टी दारू तसेच देशी व विदेशी मद्य जप्त करण्यात आले. तयार अवैध मद्याच्या विक्रीवर कारवाई करण्याबरोबरच त्याच्या निर्मितीच्या मूळ केंद्रांवर धडक कारवाई करून अवैध मद्यनिर्मितीची साखळी उद्धवस्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

बार्शी परिसरात कारवाई : दि. २ ऑक्टोबर रोजी बार्शी परिसरात ३ गुन्हे दाखल करून २ आरोपींना अटक करण्यात आली. यावेळी १०.२६ लिटर देशी मद्य, ३९.४२ लिटर विदेशी मद्य आणि ८८.२० लिटर बिअर असा एकूण ८४ हजार ६१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुळवंची तांडा, सेवालाल नगर, मार्डी परिसरात कारवाई : दि. ३ ऑक्टोबर रोजी अ विभाग, ब विभाग व भरारी पथक क्र. १ यांच्या संयुक्त कारवाईत अवैध हातभट्टी दारू निर्मिती केंद्रांवर ८ गुन्हे उघडकीस आणण्यात आले. ४ आरोपींना अटक करण्यात आली असून १४ हजार ८९० लिटर रसायन आणि १४५ लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची किंमत ६ लाख ५४ हजार ९०० रुपये आहे.

माळशिरस परिसरात कारवाई : दि. ६ ऑक्टोबर रोजी माळशिरस विभाग तसेच दुय्यम निरीक्षक माळशिरस क्र. १, २ व ३ यांच्या पथकाने २ गुन्हे दाखल करून २ आरोपींना अटक केली. यावेळी १८ लिटर देशी दारू, ५५ लिटर ताडी आणि एक दुचाकी असा एकूण १ लाख ३५ हजार १७५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मुळेगाव तांडा परिसरात मोठी कारवाई : दि. ७ ऑक्टोबर रोजी अ विभाग, ब विभाग, भरारी पथक क्र. १ व पोलीस विभागाच्या संयुक्त मोहिमेत अवैध हातभट्टी दारू निर्मिती केंद्रांवर ८ गुन्हे दाखल करण्यात आले. ७ आरोपींना अटक करण्यात आली. या कारवाईत तब्बल १६ हजार ५८० लिटर रसायन आणि ४३५ लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली असून जप्त मुद्देमालाची किंमत ६ लाख ९० हजार ३०० रुपये आहे.

सांगोला तालुक्यात कारवाई : दि. ७ ऑक्टोबर रोजी पंढरपूर विभाग तसेच दुय्यम निरीक्षक पंढरपूर क्र. २ व ३ यांच्या पथकाने सांगोला तालुका परिसरात १ गुन्हा दाखल करून १ आरोपीस अटक केली. यावेळी ३४.५६ लिटर देशी दारू आणि एक चारचाकी वाहन जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १० लाख ६५ हजार ३६० रुपये आहे.

**अवैध मद्यधंदे खपवून घेतले जाणार नाहीत**

अवैध मद्य व्यावसायिकांना इशारा देताना अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर श्रीमती भाग्यश्री पं. जाधव यांनी सांगितले की, जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे अवैध मद्यधंदे खपवून घेतले जाणार नाहीत. ग्रामीण तसेच शहरी भागात गस्त वाढविण्यात आली असून, यापुढेही अशाच प्रकारची कडक कारवाई सातत्याने सुरू राहणार आहे. अवैध व्यवसायात आढळून येणाऱ्यांविरुद्ध अजामीनपात्र कलमांन्वये गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

नागरिकांनी आपल्या परिसरात अवैध मद्यनिर्मिती किंवा विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ वर तत्काळ द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, सोलापूर यांनी केले आहे.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत SVS कॉलेज ऑफ फार्मसीला उपविजेतेपद



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** लाखेवाडी येथील जय भवानी गड विकास प्रतिष्ठानच्या विद्यानिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी येथे आयोजित करण्यात आलेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत एस.व्ही.एस. कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲंड रिसर्च, टेंभुर्णीच्या संघाने दमदार सांघिक कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत एस.व्ही.एस. संघाने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातील योगदानाचीही विशेष दखल घेण्यात आली.

स्पर्धेच्या पहिल्या फेरीत एस.व्ही.एस. संघाने स्वेरी कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूरच्या संघाचा २४-१२ अशा फरकाने पराभव करत विजयी सुरुवात केली. त्यानंतर अनेकांत एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी, बारामतीच्या संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात १९-१२ असा विजय मिळवत संघाने पुढील फेरीत प्रवेश केला.

उपांत्य फेरीतील सामन्यात एस.व्ही.एस. कॉलेज ऑफ फार्मसीने यजमान विद्यानिकेतन कॉलेज ऑफ फार्मसीच्या संघावर १५-१० अशी मात करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूरच्या संघाविरुद्ध एस.व्ही.एस. संघाने अत्यंत चुरशीचा व थरारक सामना केला. दोन्ही संघांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र, अंतिम सामन्यातील कडव्या संघर्षानंतर एस.व्ही.एस. संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

दरम्यान, संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एस.व्ही.एस. महाविद्यालयाच्या संघाचा कर्णधार सुरज बारवे यांना त्यांच्या उत्कृष्ट वैयक्तिक कामगिरीबद्दल 'प्लेयर ऑफ द सिरीज' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच उपविजेतेपद पटकावलेल्या एस.व्ही.एस. संघाला चषक व ५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

संघाच्या या यशाबद्दल करमाळा-माढा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संजयमामा शिंदे, संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

या स्पधेर्साठी एस.व्ही. एस. महाविद्यालयाच्या संघाला क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ओंकार जगदाळे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधनाभिमुख उपक्रमांसोबतच क्रीडा क्षेत्रातही दमदार वाटचाल सुरू असल्याचे दिसून आले.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस,
मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे,
इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे
होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) छ. शिवरायांवर आधारित रणजित देसाई लिखित कादंबरी २) कलर (मराठीत) ३) प्राथमिक शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी संस्था ४) फळातील गोड द्रव ५) एक औषधी लाल रंगाचे कंदमूळ ६) बोलावण्यासाठीची आरोळी ७) धावपट्टू (इंग्रजीत) ८) भाजप नेते रावसाहेब दानवे या जिल्ह्यातील आहेत ११) पडीक जमीन १२) ग्राम, खेडे १३) लोक, रयत १५) श्रीगणेशाचे एक नाव १७) गुणाकारच्या विरूध्दार्थी शब्द १८) वत उलट लिहा २०) स्वभावाने रागीट २२) विषमच्या विरूध्दार्थी शब्द २४) रक्तवाहिनी २६) शिर्डी येथील प्रसिध्द देवस्थान २७) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** २९) डांबरी रोड ३०) फिरकी गोलंदाज-यजुवेंद्र *** ३२) उत्सवाचा दिवस ३४) धांदल, गडबड ३५) कर्ज (इंग्रजीत) ३६) भाजप नेत्या-उमा *** ३८) शर्ट ३९) ब्रेड (मराठीत) ४१) मध्य मुंबईतील एक रेल्वे स्टेशन, जिना ४२) अफूप्रमाणे एक अंमली पदार्थ ४३) झाडाचे पर्ण ४४) जय-पराजय, हार-** ४५) प्रख्यात दिवंगत गायिका-** मंगेशकर ४७) याच्यापासून शिरा बनवितात

**आडवे शब्द :** १) शिवसेनेचे महाराष्ट्रातील एक खासदार
५) लालूप्रसाद मुख्यमंत्री होते ते राज्य ९) शोध, तपास १०) सल उलट लिहा
११) लगेच, लवकर १२) फळातील मुख्य गर
१३) एक म्हण-नाकापेक्षा मोती ** १४) नव्वदच्या दशकातील एक अभिनेत्री-*** टंडन १६) देवतांनी दिलेला आशिर्वाद १७) शिजवलेला तांदूळ
१९) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेशपर ग्रंथ-भगवत ** २१) आ. सुमनताई पाटील यांचा विधानसभा मतदारसंघ २३) नय उलट लिहा
२५) ओंजळ २८) याचे कणीस भाजून खातात २९) सत्वयुक्त, पौष्टीक
३०) बसण्यासाठी ही अंथरतात ३१) सक उलट लिहा ३३) लहानपण
३५) संसदेचे एक सभागृह ३७) बगिचा ३८) घर, निवास
४०) इराकची राजधानी ४२) गव्हाच्या पिठापासून बनवितात ती गोल ***
४४) प्राणप्रिय मित्र, जवळचे नाते ४६) दोघांमध्ये पडलेले अंतर, भेग (हिंदीत)
४८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत)
४९) एक हिंदी चित्रपट-** मचाये शोर, चोऱ्या करणारा
५०) वडिलार्जित संपत्तीचा हक्कदार
५१) उन्हाळ्यातील एक महिना

## सुडोकु - 73

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 3 | | 8 | 1 | | |
| 5 | 8 | 1 | | | 9 | 6 | | |
| | | 3 | 5 | | | | | |
| | 9 | | 8 | | 2 | | | |
| | | | 7 | 4 | 5 | 9 | 3 | 6 |
| 3 | 5 | | | | 6 | 8 | | 4 |
| 1 | 3 | 5 | | | | | | |
| 7 | | 8 | 6 | 1 | 3 | 4 | | |
| 9 | 4 | | | | 7 | 3 | | |

